सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १७५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शहरातील कचरा तातडीने उचलण्याचे आदेश




**जालना । प्रतिनिधी -** शहरात ठिकठिकाणी साचलेल्या कचऱ्याच्या ढिगांबाबत प्रसारमाध्यमांतून समोर आलेल्या वृत्तांची दखल घेत महापौर वंदनाताई मगरे व उपमहापौर राजेश राऊत यांनी तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनू नये, यासाठी स्वच्छता विभागाची तातडीची बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना करण्यात आल्या.

महापौर वंदनाताई मगरे यांनी शहरातील सर्व प्रभागांमध्ये साचलेला कचरा त्वरित उचलण्याचे आदेश देत, नियमित साफसफाई मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या. उपमहापौर राजेश राऊत यांनीही घंटागाडी सेवा प्रत्येक भागात वेळेवर पोहोचेल याची दक्षता घेण्यास सांगितले.

कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या असून, **पान २ वर**

### जलशुद्धीकरण केंद्राची महापौर वंदना मगरे यांनी केली पाहणी

## नवीन १५ एमएलडी फिल्टर बेड लवकर सुरु करण्याच्या दिल्या सूचना

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेचा आढावा घेण्यासाठी जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे यांनी जेईएस कॉलेज परिसरातील जलशुद्धीकरण केंद्राला अचानक भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली.

घाणेवाडी येथून येणाऱ्या पाण्याच्या शुद्धीकरण प्रक्रियेची तसेच सुरू असलेल्या नवीन फिल्टर बेडच्या कामाची त्यांनी सविस्तर माहिती घेतली. या केंद्रात घाणेवाडी येथून येणाऱ्या पाण्याचे शुद्धीकरण केले जाते.

सध्या येथे ९ एमएलडी क्षमतेचा जुना फिल्टर बेड कार्यरत असून त्याच्या शेजारी १५ एमएलडी क्षमतेचा नवीन फिल्टर बेड उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या नवीन प्रकल्पामुळे शहरातील पाणीपुरवठा अधिक सुरळीत होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

पाहणीदरम्यान महापौर वंदना मगरे यांनी जुन्या फिल्टर बेडवरील रिपेअरिंगचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच फिल्टर बेडवरील टिन पत्रे अत्यंत जीर्ण झाल्याने त्यांची त्वरित दुरुस्ती करण्याचे निर्देशही देण्यात आले.,



यावेळी जालना वितरण विभागाचे प्रमुख राजू मोरे यांच्यासह पाणीपुरवठा विभागातील अधिकारी उपस्थित होते. नवीन १५ एमएलडी फिल्टर बेड लवकरात लवकर सुरू करून शहरवासीयांना शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा करावा, अशा स्पष्ट सूचना महापौर व उपमहापौरांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महानगरपालिकेच्या वतीने शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. जलशुद्धी केंद्र येथील पाहणे दौऱ्यात महापौर वंदना मगरे यांच्यासह उपमहापौर राजेश राऊत राजू मोरे, संजय वाघमारे, शेख अहमद, रंजीत मगरे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती,

## विकसित भारतासाठी सर्वांगीण विकास महत्वाचा - डॉ. दीपक बुक्तरे

**जालना । प्रतिनिधी -** पुढील काळात भारत कसा असेल , त्यामध्ये कोणता विकास असेल, तसेच भारताच्या सर्वांगीण विकास करायचा असेल तर भारतामध्ये आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, रोजगार, आणि मूलभूत पायाभूत सुविधा या सर्वच गोष्टींमध्ये भारत विकसित होणे आवश्यक आहे, तरच विकसित भारत ही संकल्पना यशस्वी होईल, असे मत जालना समाजकार्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दीपक बुक्तरे यांनी रामनगर येथील राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिरामध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून व्यक्त केले.

जालना समाजकार्य महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर रामनगर या गावांमध्ये सुरू असून यामध्ये विविध समाज प्रबोधनाचे कार्यक्रम दररोज घेतले जात आहेत आणि त्याला नागरिकांचा खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे आज ग्रामपंचायत रामनगर या ठिकाणी प्रा. डॉ. दीपक बुक्तरे यांनी विकसित **पान २ वर**

## विकासाची चक्रे पुन्हा गतिमान करण्यासाठी रावसाहेब दानवेंना राज्यसभेवर संधी द्यावी

### मनोज पाचफुले यांची वरिष्ठांकडे आग्रही मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासह प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री ना. रावसाहेबजी दानवे पाटील यांना राज्यसभेवर नियुक्त करावे, अशी आग्रही मागणी भाजपा व्यापारी आघाडीचे जिल्हाध्यक्ष मनोज पाचफुले यांनी केली आहे.



या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना निवेदन पाठवण्यात आले आहे. श्री. पाचफुले यांनी निवेदनात म्हटले आहे की, रावसाहेब दानवे हे केवळ नेते नसून जनसामान्यांच्या मनातील विकास पुरुष आहेत. दोन वेळा आमदार आणि पाच वेळा खासदार म्हणून काम करण्याचा **पान २ वर**

### ''मन की बात'' कार्यक्रमात कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग

## मोदी यांच्या प्रेरणादायी विचारांनी कार्यकर्त्यांना नवचेतना - भास्कर दानवे



**जालना । प्रतिनिधी -** भारताचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी आज (ता.२२) सकाळी ११ वाजता ''मन की बात'' या मासिक रेडिओ कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा भाजपा जालना महानगर जिल्ह्यात प्रत्येक बूथ वर संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे हे त्यांच्या प्रभाग क्र. १ मध्ये बूथ वर आयोजित कार्यक्रमास उपस्थित होते. ''पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे मार्गदर्शन हे प्रत्येक कार्यकर्त्यासाठी प्रेरणादायी असून, मन की बात कार्यक्रमाद्वारे देशहिताचे विचार, सामाजिक जाणीवा आणि नवचेतना निर्माण होते. पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाने विकासाच्या नव्या उंची गाठल्या आहेत. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास'' या मंत्रावर चालत केंद्र सरकारने विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवल्या आहेत. या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्याने पार पाडली पाहिजे. पक्ष संघटन बळकट करण्यासाठी प्रत्येक बूथ स्तरावर कार्यकर्त्यांनी सक्रिय राहणे आवश्यक आहे. असे त्यांनी सांगितले.

तसेच सदरील कार्यक्रम भाजपा जालना महानगरातील विविध मंडळात आयोजित करण्यात आला त्यामध्ये नवीन जालना मंडळात मंडळ अध्यक्ष सुनील खरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जुना जालना मंडळात मंडळ अध्यक्ष महेश निकम, पूर्व जालना मंडळात अमोल धानुरे व जालना ग्रामीण मंडळात तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. प्रत्येक नगरसेवकांनी हा कार्यक्रम घेतला या कार्यक्रमाला महिला मोर्चा, युवा मोर्चा, व्यापारी आघाडी, अनुसूचित जाती-जमाती मोर्चा, अल्पसंख्याक मोर्चा, इत्यादी आघाड्यांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी ''मन की बात'' कार्यक्रम ऐकला.

### युवा आदर्श फाईल ...

सुस्तावलेली फाईल
आधीची गोगलगाय
काय झालं अवचित
फुटले असंख्य पाय
कसा वर्णावा वेग रे
भरारा पळतचं जाय
दफ्तर दरबार तत्पर
अरेकेली जादु काय
कुणी म्हणे कुठे तरी
वाटायलेलागले साय
फायदा घेई संधीचा
नंतर नको हाय हाय
डोळे मिटले लज्जेने
मांजरी मलिदा खाय
वाटतेसगळे निदीस्त
रे कुणांसकळत नाय
सह्या होती फटाफट
शाई ना होणारं ड्राय
दिवस करत रात्रीचा
विचारू नकातव्हाय
लफडी येताचं बाहेर
हो रडारड धाय धाय
त्राही माम् म्हणायचे
चाटायलेलागत पाय

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## महाराष्ट्र शिक्षक पॅनलचा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार कळंबे यांना जाहीर

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** महाराष्ट्र राज्य शिक्षक पॅनल च्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय सेवा सन्मान पुरस्कार नळविहीरा ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक तथा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जाफराबाद तालुकाध्यक्ष विनोद कळंबे यांना जाहीर झाला आहे.श्री कळंबे यांनी यापूर्वी जिल्हा परिषद शाळा खानापूर येथे शाळा परिसराचा भौतिक विकास यासाठी भरीव लोकसहभाग उभा करून शाळेचा कायापालट केलेला आहे.याशिवाय शिक्षण आणि युगंधर प्रतिष्ठान च्या माध्यमातून केलेल्या सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या भरीव कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शिक्षक पॅनलने त्यांची सदर पुरस्कारासाठी निवड केली आहे. १७ मे रोजी शिर्डी येथे साईबाबा सांस्कृतिक भवनात आयोजित भव्य समारंभात त्यांना सदर पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र शिक्षक दिनाचे अध्यक्ष दीपक चामे यांच्या सह निवड समितीने नियुक्तीपत्रद्वारे कळविले आहे.राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य नेते उत्तमराव वायाळ, जिल्हाध्यक्ष भगवान भालके, सरचिटणीस शांतीलाल गोरे, कार्यकारी अध्यक्ष



अण्णा इंगळे, गटशिक्षणाधिकारी सतीश शिंदे,शिक्षण विस्तार अधिकारी जिनेंद्र काळे, रामकुमार खराडे,प्राथमिक शिक्षक संघाचे जाफराबाद तालुका अध्यक्ष प्रदीप साळोख, जाफराबाद शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन गणेश पवार, व्हॉइस चेअरमन प्रदीप ताठे, मानद सचिव संजय लोखंडे, संचालक वसंत शेवाळे, दीपक चव्हाण, सुखदेव अवकाळे, अभिजीत साळवे, किरण कुमार तिडके, संजय निकम, गणेश फुकट, संचालिका छाया पुंगळे, सुनिता खलसे, प्रहार चे भोकरदन तालुकाध्यक्ष संदीप सोळंके, जाफराबाद तालुकाध्यक्ष कैलास बकाल, शिक्षक भारतीचे **पान २ वर**

## अन्नदान हीच शिवपूजेची साक्षात अनुभूती; सेवेतूनच भक्तीची परिपूर्ती - ह.भ.प. मदने माऊली महाराज

### पीसीएम मंठा शाखेचा शिवमय प्रसाद वाटप उपक्रम

**मंठा । प्रतिनिधी -** महाशिवरात्रीच्या पवित्र प्रभातकाळी मंठा नगरी जणू शिवतत्त्वाच्या अलौकिक स्पंदनांनी न्हाऊन निघाली होती. मंदिरांच्या घंटानादात, मंत्रोच्चारांच्या गंभीर लयीत आणि भक्तिभावाच्या ओलाव्यात अध्यात्म, सेवा आणि समाजबंध यांचा दिव्य त्रिवेणी संगम साकार झाला. या मंगल क्षणी प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्र (पीसीएम) पत्रकार संघ, मंठा शाखेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवमय फराळ-वाटप उपक्रमाने सेवाभावाची साक्षात मूर्तीच उभी केली.

श्री लक्ष्मीनारायण मंदिर तसेच जगदंबादेवी मार्गावरील वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रेमपूर्वक व सात्विक भावनेने फराळाचे वितरण करण्यात आले. पहाटे ६.४५ ते ११.०० या वेळेत पार पडलेल्या या उपक्रमात प्रत्येक क्षण 'ॐ नमः शिवाय'च्या अखंड गजराने दुमदुमत होता. वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या स्वरांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता; जणू भक्ती आणि सेवा एकरूप होऊन शिवआराधनेचे सजीव रूप धारण करत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प. मदने माऊली महाराज विराजमान होते. प्रमुख पाहुणे म्हणून पीसीएम पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार हरिराम तिवारी (बाबूजी तिवारी) तसेच जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रा. प्रदीप देशमुख उपस्थित होते. व्यासपीठावर पीसीएम पत्रकार संघ मंठाचे तालुकाध्यक्ष डॉ. आशिष तिवारी, योगेश देशमुख, जीवन काळे, अतुल खरात, गजानन माळकर, आतिश राठोड, अंकुश देशमाने, सुभाष झरेकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय मनोगतात ह.भ.प. मदने माऊली महाराजांनी अन्नदानाचे दैवी महात्म्य अत्यंत भावपूर्ण शब्दांत अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, अन्नदान ही केवळ सामाजिक कृती नसून ती आत्म्याला परमेश्वराशी जोडणारी साधना आहे. सेवा हीच खरी शिवपूजा असून, गरजूंना प्रेमाने अन्न देणे म्हणजे शिवतत्त्वाची प्रत्यक्ष आराधना होय.



या प्रसंगी त्यांनी अभंगाच्या ओव्या सादर करत वातावरण अधिक भक्तिमय केले

''तेथे एक शीत दिधल्या अन्न!
कोटी कुळांचे होय उद्धरण!
कोटी याग केले पूर्ण!
ऐसे महिमान ये तीर्थाचे!''

प्रेमपूर्वक अर्पण केलेला अन्नाचा एक घासही कोटी कुळांच्या उद्धाराचे कारण ठरतो, असे सांगत त्यांनी या उपक्रमास 'शिवपूजेचे साक्षात रूप' असे संबोधले. वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांप्रती अनेक वर्षांपासून सातत्याने होत असलेले फराळ-वाटप हे निस्सीम सेवाभावाचे तेजस्वी उदाहरण असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. समाजात समत्व, करुणा आणि बांधिलकी **पान २ वर**

# संपादकीय पान

## कर्मयोगी ...

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १५० वि जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# रेवडी संस्कृतीला राजकीय पुढारीच जबाबदार; यांच्यावर कठोर कारवाईची गरज

रेवडी संस्कृतीचे विष राजकीय पुढाऱ्यांनी पेरले आहे याचाच परिणाम म्हणून महागाईने अक्राळविक्राळ रूप धारण केले आहे.रेवडी संस्कृतीचा फायदा सर्वप्रथम राजकीय पुढारी स्वतः घेतात आणि दिखावा म्हणून १० टक्के जनतेला तुटपुंजा फायदा पोहचवितात.यावरून स्पष्ट होते राजकीय पुढारी स्वतः च्या सोयीनुसार व स्वार्थासाठी कोणत्याही प्रकारचे वाटेल तसे निर्णय घेतात हा राजकीय पुढाऱ्यांचा मोठा अपराध आणि गुन्हा आहे असे मी समजतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचे राज्य सरकारांवरील ताशेरे योग्यच याचे मी स्वागत करतो.मी सर्वोच्च न्यायालयाला विनंती करेन की, शेतकरी, गरीब, सर्वसामान्यांना राजकीय पुढाऱ्यांनी स्वतः च्या स्वार्थासाठी करोडो लोकांना गुमराह करण्याचे काम केले आहे.याकरीता सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारांमधील मोफत योजना जाहीर करणाऱ्यां राजकीय पुढाऱ्यांवर कठोर कारवाई करायला हवी.कारण राजकीय पुढारी आमजनतेची दिशाभूल करण्यासाठी रेवड्या वाटण्याचे चुकीचे काम करतात. यामुळे जनतेला फायदा कमी होतोच परंतु नुकसान जास्त होते. त्याचेच प्रायश्चित्त आज सर्वसामान्यांना महागाईच्या रूपात भोगावे लागत आहेत. त्यामुळेच सरकारचे दिवसेंदिवस रोजगार निर्मितीकडे दुर्लक्ष होत आहे आणि सरकारच्या मोफत धोरणामुळे व चुकीच्या पद्धतीमुळे रोजगार निर्मिची पुर्णतः वाट लागली आहे.याचे मुख्य सुत्रधार राज्य सरकारे व त्यातील राजकीय पुढारी असल्याने त्यांच्या कठोर करावाईची गरज आहे.रेवडी संस्कृतीचा फायदा राजकीय पुढारी जास्त घेत आहेत. निवडणूका आल्यात की प्रत्येक पक्ष,राजकीय पुढारी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या आश्वासनाचा भडीमार करतात आणि निवडून आले की त्यातली काही पुर्ती करावी लागते.अशा पध्दतीने देशातील प्रत्येक राज्य सरकारे आपल्या स्वार्थासाठी मोफत गोष्टी देण्याच्या घोषणा करतात. कारण यात गरीब व सर्वसामान्यांचे हित कमी व राजकीय पुढाऱ्यांचे हीत जास्त दिसून येते.कारण मोफत अन्नधान्य, सायकली, गॅस,वीज,रोख रक्कम अनेक योजनेअंतर्गत पैसा वाटप यामुळे देशातील प्रत्येक राज्यांवर बोजा वाढत असतो ही बाब सत्य आहे.यावर अंकुश लावने गरजेचे आहे. परंतु राजकीय पुढारी सरकारी सुविधांचा गैरफायदा घेतात त्याचे काय? सर्वसामान्य किंवा गरीब यांना सरकार ज्या काही गोष्टी मोफत देतात यात त्यांचा काय दोष?मोफतची संस्कृती आणली कोणी? देशातील राज्यात जर मोफत वस्तू एक कोटीच्या वाटल्या जात असेल तर त्यांच्या दहा पट कमाई अप्रत्यक्षरीत्या राजकीय पुढारी करून घेतात.देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत देशात व प्रत्येक राज्यात अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु एकाही सरकारने महागाईवर लक्ष दिलेच नाही आणि कमी करण्यावर अजीबात लक्ष दिले नाही.याला दोषी राजकीय पुढारीच.आज देशात महागाईचा एवढा मोठा कळस उभा झाला आहे की,त्याची झळ देशाचा शेतकरी, बेरोजगार युवक, विद्यार्थी, गरीब, सर्वसामान्य मोठ्या प्रमाणात भोगत आहे.याचेच प्रायश्चित्त म्हणून देशात आत्महत्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.मोफत वस्तू कोणालाच नको असते आणि तशी आपली संस्कृती सुद्धा आहे.मोफत वस्तू म्हणजे माझ्या मते सरकारने दिलेले स्लो पॉयझनच म्हणावे लागेल. परंतु देशातील मुठभर राजकीय पुढारी भ्रष्टाचार करतात, वाममार्गाने पैसा कमवून डांबून ठेवतात,सरकारी सुविधा, पेंशन,भत्ते, गाडी, बंगला विदेशात पैसा गुंतवणे आणि करोडोंची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती डांबून ठेवतात तेव्हा यांच्यावर पाहिजे तशी कारवाई होतच नाही यामुळेही देशात व राज्यात महागाई आणि बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.देशात महागाई का वाढत आहे लोकांना मोफतची सवय का लागली आणि कुणी लावली या संपूर्ण प्रश्नांचे उत्तर फक्त राजकीय पुढारीच देवू शकतात.राजकीय पुढारी मोफतवर जास्त भर देतात कारण त्यांना कल्पना असते की आपल्या खीशातुन काय जाणार? परंतु फायदा आपलाच होणार.त्यामुळे हमखास मोफत सुविधा प्रदान करण्याचे काम सरकार करीत असते. परंतु उदाहरण द्यायचे झाले तर एका व्यक्तीला जर महिन्याला १००० रूपये खर्च येत असेल तर त्याला सरकार कडून फक्त १०० रूपयांचीच मोफत सुविधा उपलब्ध होते. कारण सरकार १०० रूपयांची वस्तू जर मोफत देत असेल तर महागाई १० पटीने वाढवीत असते आणि याची झळ शेतकरी, शेतमजूर, गरीब व सर्वसामान्यांना भोगावी लागते. त्यामुळे देशातील वाढती महागाई व रेवडी संस्कृतीला जबाबदार राजकीय पुढारीच असल्याचे मी समजतो.आज देश विकासाच्या उंबरठ्यावर आहे परंतु रोजगारासाठी बेरोजगार युवक वनवन हिंडताना दिसतात हे सरकारला का दिसत नाही?याला जबाबदार सरकारने सुरू केलेली रेवडी संस्कृती, भ्रष्टाचार व सरकारचे चुकीचे धोरण.आजही राजकीय पुढाऱ्यांवर भ्रष्टाचारांचे आरोप लागतात भ्रष्टाचाराची हजारो कागदांची फाईल तयार होते. परंतू सत्तेत आले की या संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यांना सरकार कडून क्लीन चिट दिली जाते हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. सरकार जर लोकांच्या खात्यात थेट पैसे जमा करीत असेल तर त्यांनी काम का करावे असाही प्रश्न उपस्थित होतो! काही राज्यांमध्ये सरकारने अलीकडच्या काळात निवडणूकीपूर्वी अचानक जाहीर झालेल्या रोख हस्तांतरण केल्या म्हणजेच रेवड्या वाटुन स्वतः स्वार्थ साधले हे तर आचारसंहितेचे व लोकशाही प्रणालीचे घोर उल्लंघनच म्हणावे लागेल.या संपूर्ण बाबींनवरून लक्षात येते की सत्तेसाठी सरकार किंवा राजकीय पुढारी कोणत्याही स्तरावर जायला मागेपुढे पाहत नाहीत हे कृषी प्रधान देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.शेतकऱ्याच्या मालाला योग्य भाव नाही, शेतकऱ्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढतच आहे, बेरोजगारीचे प्रमाण वाढल्याने युवावर्गामध्ये मोठा मनस्ताप आहे.अति दुर्गम भागात सरकारचे दुर्लक्ष असल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे.या महत्वपूर्ण गोष्टींकडे सरकार लक्ष न देता रेवड्या वाटून जनतेची,राज्याची व देशाची खुली दिशाभूल करत असल्याचे दिसून येते.सरकारने एक लक्षात ठेवले पाहिजे की,रेवड्या वाटण्यापेक्षा आरोग्य सुविधा व शिक्षण सुविधा मोफत करावी याचा फायदा सर्वांनाच होईल. एखाद्यावर वीज बिल किंवा कोणताही टॅक्स थकबाकी असला तर त्यावर सरकार कठोर कारवाई करते.अशा परिस्थितीत त्यांना मोफत सुविधा का आठवत नाही? देशातील कोणत्याही व्यक्तीला मोफत सुविधा नकोच असते परंतु राजकीय पुढारी स्वतः च्या स्वार्थासाठी मोफतचे विष पेरण्याचे कम करीत असतात व यातुनच महागाई व बेरोजगारीची उत्पत्ती झाल्याचे पाहायला मिळते आणि यातूनच निर्माण होते कुपोषण, बेरोजगारी, मानसिक आरोग्यात बिघाड,आत्महत्या ह्या उघड्या डोळ्यांनी दिसून येतात.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर**

# व्यसनमुक्ती व शिवविचार आचरणात आणा; तेव्हाच शिवजयंतीचे सार्थक - ह.भ.प. कन्हैयाजी महाराज

**दिंडोरी । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात जन्माला येणे हे आपले भाग्य असून युवकांनी अवगुण व व्यसनांचा त्याग करून शिवाजी महाराजांचे विचार आचरणात आणले, तरच शिवजयंती उत्सव साजरा करण्याचे खरे सार्थक होईल, असे प्रतिपादन भागवत भूषण शिवचरित्रकार ह.भ.प. कन्हैयाजी महाराज ब्रम्हणपुर यांनी केले.

खतवड येथे शिवस्वराज्य ग्रुपच्या वतीने आयोजित शिवजयंती उत्सवानिमित्त आयोजित कीर्तन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील पराक्रम, दूरदृष्टी, धर्मनिष्ठा व लोककल्याणकारी राज्यकारभार यांचा प्रभावी शब्दांत उलगडा केला. तसेच संतभूमी महाराष्ट्राची परंपरा, राजमाता जिजाऊ यांनी दिलेले संस्कार आणि स्वराज्य स्थापनेमागील प्रेरणा यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कन्हैयाजी महाराज म्हणाले की, महाराष्ट्र ही संतांची व वीरांची भूमी असून येथील युवकांनी राष्ट्रप्रेम, त्याग, शिस्त व संस्कार यांचे पालन करणे गरजेचे आहे. समाजातील व्यसनाधीनता, अवगुण व चुकीच्या प्रवृत्तींपासून दूर राहून युवकांनी समाजहितासाठी कार्य करावे.त्यांनी हरिकिर्तनातून शिवचरित्राचा इतिहास उलगडला. या शिवजयंती उत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन, नवविवाहित जोडप्यांच्या हस्ते आरती, विविध घोषणा तसेच नाशिक ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने करण्यात आली. शिवस्वराज्य ग्रुपच्या या उपक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये शिवचरित्राविषयी जागरूकता व सामाजिक एकात्मता वाढीस लागल्याचे दिसून आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिव स्वराज ग्रुपच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.



पान १ वरुन

### शहरातील कचरा ...

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले.

तसेच नागरिकांनीही ओला व सुका कचरा वेगळा करून महानगरपालिकेला सहकार्य करावे, आपला परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन महापौर वंदनाताई मगरे व उपमहापौर राजेश राऊत यांनी केले आहे. महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### विकसित भारतासाठी ...

भारत ही संकल्पना स्पष्ट केली असून २०४७ म्हणजेच जेव्हा भारतीय स्वातंत्र्याला १०० वर्ष पूर्ण होतील तेव्हा हा भारत जगातील एक प्रमुख विकसित देश असेल असे मत प्रा. डॉ. दीपक बुक्तरे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. प्रवीण कनकुटे यांनी विकसित भारत ही संकल्पना एक स्वप्न असून हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पुढील काळामध्ये अतिशय मेहनत घेणे आवश्यक असल्याचे तसेच देशातील मोजक्या काही उद्योगपतींचा आणि भांडवलदारांचा विकास म्हणजे विकसित भारत नाही तर भारतातील जनतेला उत्कृष्ट राहणीमान आणि आरोग्य शिक्षण रोजगार या सुविधा उपलब्ध करून देणे ही विकसित भारताची प्रमुख उद्दिष्ट आहेत असे म्हटले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक योगेश पवार यांनी केले तर आभार रोहन राठोड यांनी व्यक्त केले या कार्यक्रमास महाविद्यालया चे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### विकासाची चक्रे ...

त्यांना दांडगा अनुभव आहे. त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्याने विकासाची मोठी झेप घेतली होती. मात्र, सध्या विकासाची ही चक्रे काहीशी मंदावली आहेत. जालना हे राज्यातील एक प्रमुख व्यापारी आणि औद्योगिक केंद्र असल्याने, शहराच्या आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी दानवे यांचे अनुभवी नेतृत्व राज्यसभेवर असणे काळाची गरज आहे. जिल्ह्यातील रेल्वेचे प्रश्न असोत किंवा उद्योग-व्यापाराच्या समस्या, रावसाहेब दानवे यांनी नेहमीच आक्रमकपणे पाठपुरावा केला आहे. थांबलेली विकासाची कामे पुन्हा मार्गी लावण्यासाठी आणि जालना जिल्ह्याचा आवाज दिल्लीत अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी त्यांना राज्यसभेची संधी द्यावी, असेही पाचफुले यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### महाराष्ट्र शिक्षक ...

तालुका अध्यक्ष विजय वैद्य, बद्रीनाथ जायभाये,लिंबाजी कड ,अनिल भोसले, केंद्रप्रमुख सुधाकर चिंधोटे, गजानन मांटे, डि.के. सोनवणे, सुभाष काळे, विष्णू जायभाये, बी.एल.देशमुख,अशोक चिंचोले, शिवाजी फोलाने,राजकुमार खंडेलवाल,जाफराबाद तालुक्यातील सर्वच क्षेत्रातील मान्यवरांनी स्वागत केले आहे.

### अन्नदान हीच ...

जपण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रा. प्रदीप देशमुख यांनीही आपल्या मनोगतात सेवा आणि औदार्य हीच खरी संस्कृतीची ओळख असल्याचे प्रतिपादन केले. ''आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो'' ही भावना जपली तर समाजपरिवर्तन सहज शक्य होते, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पीसीएम पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष डॉ. आशिष तिवारी यांनी केले, तर आभार प्रदर्शन अतुल खरात यांनी मानले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगेश देशमुख, गणेश खराबे, आतिश राठोड, बाळासाहेब खराबे, राजकुमार कांगणे, रशीद पठाण, विजय राठोड, उस्मान पठाण, एकनाथ एंडइत, जिजाभाऊ गते, शेंडगेभाऊ आदींनी परिश्रम घेतले. फराळाची सात्विक व रुचकर तयारी आचारी कैलास पवार, हुकुमसिंग राजपुरोहित आणि प्रल्हाद नरवडे यांनी केली.

महाशिवरात्रीच्या या पावन पर्वावर साकारलेली ही प्रसादवाटप केवळ अन्नवितरणाचा उपक्रम न ठरता समत्व, सेवा आणि श्रद्धेचा सजीव उत्सव ठरली. शिवनामाच्या अखंड गजरात आणि सेवाभावाच्या ऊर्जेतून प्रकटलेली ही शिवआराधना मंठा नगरीसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरलीजिथे सेवा म्हणजेच साधना आणि दान म्हणजेच देवत्व, याची अनुभूती सर्वांना लाभली.

# सक्षममध्ये ‘एआय मावळा’द्वारे शिवरायांच्या नीतिमूल्यांचे धडे; विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद




**जालना । प्रतिनिधी -** येथील सक्षम संस्थेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे औचित्य साधून सक्षम कॉम्प्युटर्सतर्फे ‘सक्षम एआय मावळा’ या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. या कल्पक उपक्रमाची संकल्पना आणि निर्मिती नारायण दाभाडकर यांनी केली आहे.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे डिजिटल डिस्प्ले वरप्रत्यक्ष दिसणारा ‘एआय मावळा’ होता. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांची जीवनमूल्ये आणि मार्गदर्शक तत्त्वे उपस्थितांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यात आली. पडद्यावरील मावळा हुबेहूब हालचाली करत बोलत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह आणि कुतूहल पाहायला मिळाले.

एआय मावळ्याच्या माध्यमातून महाराजांची नीतिमूल्ये सोप्या उदाहरणांसह समजावून सांगण्यात आली. यावेळी तंत्रज्ञानावर आधारित प्रश्नमंजूषा घेऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची चाचणी घेण्यात आली. प्रश्नमंजूषा पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी महाराजांचा प्रेरणादायी सुविचार सांगून उपस्थितांना प्रोत्साहित करण्यात आले. या नाविन्यपूर्ण प्रयोगाने तंत्रज्ञान आणि इतिहास यांचा सुरेख संगम घडवून आणला असून, सर्व स्तरांतून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# हिवरा रोशनगाव येथील श्री क्षेत्र विठ्ठल माळावर अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

### हभप पुंडलिक महाराज जंगले शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाला समारोप



**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील हिवरा रोशनगाव येथे डोंगररांगावर वसलेल्या श्री क्षेत्र विठ्ठल माळ येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १६ फेब्रुवारीपासून प्रारंभ झालेला हा सप्ताह पाच दिवस विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन व सेवाभावी उपक्रमांनी भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

वैकुंठवासी म्हातारबाबा शिंदे यांच्या आशीर्वाद व प्रेरणेने तसेच लोकवर्गणीतून येथे भव्य विठ्ठल-रुक्मिणी मंदिर उभारण्यात आले आहे. मंदिरातील मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहादरम्यान स्मृती प्रतिष्ठान व कलश स्थापना विधी पार पडले. या सप्ताहाची सांगता आज सकाळी १० ते १२ या वेळेत हभप पुंडलिक महाराज जंगले (शास्त्री) यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. त्यांच्या कीर्तनासाठी पंचक्रोशीतील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सप्ताहभर पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी करत नामस्मरण, भजन-कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेतला. कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. आयोजकांनी सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घेतला. सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थ व भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

# प्रशासकीय दिरंगाईचा विद्यार्थ्यांना फटका; कुणबी प्रमाणपत्रासाठी विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला

**पाटोदा । प्रतिनिधी -** पाटोदा तालुक्यातील पाटोदा माव येथील एका जुन्या जन्म नोंद रजिस्टरवरून कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळण्यास होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. याप्रकरणी कुणबी, मराठा -कुणबी व कुणबी-मराठा आढळून आलेल्या नोंदीच्या आधारे पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यासाठी गठीत समिती अध्यक्ष न्यायमूर्ती संदीप शिंदे जालना जिल्हा दौऱ्यावर असताना आज दिनांक २०/०२/२०२५ रोजी पाच वाजता एक निवेदन देण्यात येऊन त्यांना साकडे घालण्यात आले असून, प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची मागणी होत आहे.

**नेमके प्रकरण काय?**

पाटोदा माव येथील माजी सरपंच श्री. आसारामजी खवल यांच्या जुन्या घरात दसऱ्याच्या साफसफाई दरम्यान जन्म-मृत्यू नोंदीचे एक जुने रजिस्टर सापडले होते. या ऐतिहासिक दस्तऐवजात अनेक ग्रामस्थांच्या 'कुणबी' नोंदी आढळल्या आहेत. हे महत्त्वाचे रजिस्टर माजी सरपंचांनी जबाबदारीने चार महिन्यांपूर्वीच ग्रामविकास अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्या स्वाधीन केले आहे.



**विद्यार्थ्यांसमोर अडचणींचा डोंगर**

सध्या छएएढ आणि इतर महत्त्वाच्या स्पर्धा परीक्षांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना कुणबी जातीच्या प्रमाणपत्राची अत्यंत गरज आहे. मात्र, या नोंदी उपलब्ध असूनही केवळ काही 'खोट्या तक्रारींमुळे' प्रशासनाने हे प्रमाणपत्र देण्याचे काम थांबवून ठेवले असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडचे माजी प्रदेशा कार्याध्यक्ष भरत मानकर, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष पांडुरंग नवल , राजाभाऊ शिंदे, समाधान नाईक नवरे, खंडेश्वर लहाने, उमेश लहाने, गणेश खबर, राम नखाते, संभाजी शिंदे , आदींनी निवेदन दिले आहे.

नोंदी सापडून आणि त्या प्रशासनाकडे जमा करून चार महिने उलटले आहेत. तरीही केवळ तांत्रिक कारणे आणि तक्रारींच्या नावाखाली विद्यार्थ्यांना वेठीस धरले जात आहे. परीक्षांच्या तारखा जवळ आल्याने विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाण्याची भीती आहे.

- ग्रामस्थ व पालक

**न्यायमूर्तींकडे धाव**

या गंभीर विषयावर तोडगा काढण्यासाठी आता न्यायमूर्ती शिंदे साहेब यांना पत्र लिहून विनंती करण्यात आली आहे. खोट्या तक्रारींची दखल घेऊन पात्र विद्यार्थ्यांना हक्काच्या प्रमाणपत्रापासून वंचित ठेवू नये. स्पर्धा परीक्षांची निकड लक्षात घेता, प्रशासनाला तातडीने आदेश देऊन प्रमाणपत्र वाटप सुरू करावे, अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

प्रशासन आता यावर काय भूमिका घेते आणि हवालदिल झालेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळतो का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# रायझिंग स्टार स्कूलच्या उपक्रमशील प्रिन्सिपल ममता मसूरकर यांना इंडियन एज्युकेशन स्टार अवॉर्ड- २०२६ प्रदान

**ठाणे । प्रतिनिधी -** कळवा ,एशियन युथ इमेज कॉन्फरन्स आणि अवार्ड सिरेमनी ठाणे २०२६ तसेच समृद्धी प्रकाशन यांच्यावतीने ठाणे येथील माझे ग्रंथ भंडार सभागृहात संपन्न झाले. यावेळी कळवा येथील उपक्रमशील प्रिन्सिपल व सामाजिक कार्यकर्त्या व सतत सातत्याने विविध सामाजिक विषयांवर आवाज उठवत आपल्या अभिनव कामगिरीने जनसेवेचे व्रत घेतलेल्या ममता मसूरकर यांना इंडियन एज्युकेशन स्टार अवॉर्ड २०२६ पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजक इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डचे चीप एडिटर डॉ.बी एन खरात हे असून या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध अभिनेते दीपक जोशी ,श्री विजय जाधव उपनियंत्रण (नागरी संरक्षण, नवी मुंबई ,समूह ठाणे, गृह विभाग )विशेष महाराष्ट्र शासन डॉ.योगिता सावंत, समाजसेवक भारत खांडेकर ,डॉ. भूपेंद्र संखे यांच्यासह अनेक मान्यवर कार्यक्रमात उपस्थित होते.

या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन ममता मसूरकर यांना गौरविण्यात आले. आपल्या जीवनशैली हक्कासाठी, ध्येयासाठी आणि राष्ट्र विकासाच्या उन्नतीसाठी सतत धडपडत असणाऱ्या ममता मसूरकर यांच्या कर्तृत्वाला आणि प्रामाणिक प्रयत्नांना मानाचा मुजरा ममता मसूरकर यांना इंडियन एज्युकेशन स्टार अवॉर्ड २०२६ पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.





**जालना येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ जयंती निमित्त शहरात सांस्कृतिक मंडळ तर्फे सर्वपक्षीय शिवजयंती मिरवणूक काढण्यात आली होती त्याचे उत्कृष्ट छायाचित्र तसेच विशेष सहकार्य केल्याबद्दल वृत्तपत्र छायाचित्रकार जावेद तांबोळी यांना मानचिन्ह देऊन गौरवण्यात आला. यावेळी सर्वपक्षीय जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष देविदान. सोबत संस्थापक अध्यक्ष अंकुश राऊत, कार्याध्यक्ष रवींद्र राऊत, शिवप्रकाश चितळकर, सतीश जाधव, रोहित भुरेवाल आदर्श राऊत.**



# गावे आधुनिक तीर्थक्षेत्र बनविण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा - भाऊ कदम

**जालना । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन काम केल्यास गावे आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणून नावरूपास येतील, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभिनेते भाऊ कदम यांनी केले. जालना जिल्ह्यातील सावरगाव हडप येथे आयोजित कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाऊ कदम यांनी दगडवाडी (ता. भोकरदन), सावरगाव हडप व मानेगाव (ता. जालना) तसेच लोणी (ता. परतूर) येथील ग्रामस्थांशी संवाद साधत गावांच्या सर्वांगीण विकासासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. विविध विकासकामांची पाहणी करताना ग्रामपंचायतींनी राबविलेल्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. गावांचा विकास करताना स्वच्छता, वृक्षारोपण, शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरण यावर विशेष भर दिल्यास गावे आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होऊ शकतात, असे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमादरम्यान त्यांनी वृक्षलागवड करून ग्रामस्थांशी संवाद साधत






स्थानिक समस्या जाणून घेत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमात ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. विकासकामांना गती देण्यासाठी प्रशासन व ग्रामपंचायतींनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले. ग्रामस्थांच्या वतीने मान्यवरांची बैलगाडीतून मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले.

उपसरपंच विठ्ठल डोंगरे यांनी संचालन करून गावातील विकासकामांची माहिती दिली, तर ग्राम विकास अधिकारी अलका धांडे यांनी अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कामांचे सादरीकरण केले. प्रभू डोंगरे, विस्तार अधिकारी आर. डी. देशमुख, सूर्यवंशी, पंकज ढाकणे, जनसंपर्क अधिकारी भगवान तायड, अमर डोईफोडे यांच्यासह सरपंच इंदुबाई राऊत, उपसरपंच विठ्ठल भाऊ डोंगरे, शिवा दादा शेजुळ, प्रभाकर डोंगरे, अशोक बिटले, विष्णु शिंदे, दिगंबर शिंदे, सोपान महाराज डोंगरे, कृष्णा दादा डोंगरे, वसंतदादा डोंगरे, माऊली डोंगरे, रेवनाथ पांचाळ यांची उपस्थिती होती.

# नागरिकाभिमुख महसूल प्रशासनासाठी समन्वय व क्षेत्रीय दौरे वाढवा - विकास खारगे

## छत्रपती संभाजीनगर विभागातील महसूल कामकाज व विकास प्रकल्पांचा आढावा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक वेगाने, पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने मिळाव्यात यासाठी जिल्हा स्तरावरील समन्वय वाढविणे, क्षेत्रीय दौरे वाढविणे आणि नागरिकांशी थेट संवाद साधणे अत्यावश्यक असल्याचे निर्देश महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील महसूल प्रशासनाचे कामकाज, विकास प्रकल्पांची अंमलबजावणी, विविध शासकीय योजनांची प्रगती तसेच नागरिकाभिमुख सेवांची स्थिती यांचा सविस्तर आढावा त्यांनी विभागीय स्तरावर घेतला. ही बैठक छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली. बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, अप्पर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, अप्पर आयुक्त विकास (आस्थापना) दादासाहेब वानखेडे, अप्पर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अप्पर आयुक्त (सामान्य प्रशासन) मंजुषा मिसकर, अप्पर आयुक्त खुशालसिंह आर. परदेशी, सह-आयुक्त रोजगार हमी योजना डॉ. अनंत गव्हाणे, सह आयुक्त (नगर परिषद प्रशासन) देविदास टेकाळे यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे म्हणाले की, नागरिकांना शासनाच्या सेवा वेळेत उपलब्ध होणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे कमी करून सेवा वितरणाची गती वाढविण्यासोबतच विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस क्षेत्रीय पातळीवर दौरा करून स्थानिक पातळीवरील कामकाजाचा आढावा घ्यावा व नागरिकांशी संवाद साधावा, असे त्यांनी सांगितले.

'महाराजस्व अभियान' हे अत्यंत महत्त्वाचे अभियान असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि त्याबाबतचे अहवाल वेळेत ऑनलाईन सादर करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीत मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांमधील महसूल विषयक प्रलंबित प्रकरणे, जमीन अभिलेखांचे अद्ययावतीकरण, ई-प्रणालीद्वारे सेवा वितरण, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, इज ऑफ लिव्हिंग, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन तसेच शासनाच्या महत्त्वाच्या विकास योजनांची अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जमीन नोंदींचे संगणकीकरण, महसूल प्रकरणांचा त्वरित निपटारा आणि शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकाऱ्यांनी सक्रिय भूमिका घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विभागात सुरू असलेल्या विविध कामकाजाची माहिती दिली. बैठकीस महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषदेच्या शाळेतून देखील उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन - विनोद कळंबे

## शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** जिल्हा परिषदेच्या शाळेतून देखील उत्कृष्ट सांस्कृतिक कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन केले जात असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे जाफराबाद तालुकाध्यक्ष तथा जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन विनोद कळंबे यांनी केले. डावरगाव देवी ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलनाच्य उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.यावेळी जाफराबाद पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी रामकुमार खराडे, आदर्श शिक्षक जमीर शेख, सेवानिवृत्त विस्तार अधिकारी सखाराम नवले,अशोक हरकळ ,डी. के. खरात, दगडुबा देठे, टेंभुर्णी केंद्रांतर्गत सर्व मुख्याध्यापक व शिक्षक, डावरगाव देवीचे सरपंच, उपसरपंच, सर्व ग्राम संसद सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य, पोलिस पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना श्री कळंबे यांनी जिल्हा परिषद शाळा वाचविण्यासाठी आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामस्थानी साथ देण्याचे आवाहन केले.यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत,लोकगीते, हिंदी,मराठी चित्रपट गीतांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.अंगणवाडीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ही एक नृत्य यावेळी सादर केले.यावेळी गावातील सर्व गावकरी मंडळी, तरुण मित्र मंडळ, महिला भगिनी, पालक वर्ग व विद्यार्थी या सर्वांची उपस्थिती लक्षणीय होती. उपास्थित रसिक प्रेक्षकांनी तब्बल ४५ हजार रुपयांच्या बक्षिसाची उधळण केली. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक महेश अहिरे, प्रभाकर बनकर, आश्रुबा बुरकुल, नानासाहेब कोरडे , सुनिल पवार, धनंजय आढाव, रिबिका साने यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आश्रुबा बुरकुल यांनी केले.

# माहोरा येथील ९० मुलींनी नोंदवला स्वसंरक्षनचे धडे या महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमा अंतर्गत सहभाग



**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील माहोरा येथील मुलींनी ग्रँड मास्टर शिपुजी भरद्वाज यांच्याकडून माहोरा पंचक्रोशीतील ९० मुलींनी घेतले आत्मसंरक्षणाचे धडे महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासनाचा उपक्रम अंतर्गत मुलींसाठी मोफत दोन दिवशीय राज्यस्तरीय स्वसंरक्षण देण्यात आले ग्रँड मास्टर सिंपू जी भरद्वाज यांच्या उपस्थितीत १७ ते १८ फेब्रुवारी २०२६ आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल कोपरगाव रोड कोमठाण कोपरगाव या ठिकाणी देण्यात आले. त्या ठिकाणी तीन हजार पेक्षा जास्त मुलींनी सहभाग घेतला होता महाराष्ट्र शासन व शालेय शिक्षण विभाग व मुख्यमंत्री फडणीस साहेब उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब शालेय शिक्षण मंत्री दादा पुसे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली दोन दिवसीय राज्यस्तरीय मुलींना आत्मसुरक्षा शिबिर आयोजन करण्यात आले होते. तसेच गर्ल्स सेल्फ डिफेन्स संस्थेचे अध्यक्ष वैशाली वाघमारे यांच्या माध्यमातून माहोरा पंचक्रोशीतील ९० मुलींनी सहभाग नोंदवून आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण पूर्ण करून प्रमाणपत्र मिळविले तसेच या कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य दिनेश वाघमारे गजानन यांचे सोनवणे सर,बरडवाल मॅडम, गायकवाड मॅडम, डिस्ट्रिक्ट कॉर्नर दिघे सर या सर्वांचे सहकार्य लाभले.

# 'डीपीडीपी' कायद्याअंतर्गत नागरिकांकडेच डेटा संरक्षणाचे अधिकार -प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## लोक प्रशासन संस्था प्रशिक्षण वर्गात 'डीपीडीपी' कायद्यावर मार्गदर्शन

**मुंबई । प्रतिनिधी -** डिजीटल पर्सनल डाटा प्रोटेक्शन (डीपीडीपी) कायदा, २०२३ हा नागरिक केंद्रीत आहे. या कायद्याअंतर्गत नागरिकांना त्यांची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचा अधिकार प्राप्त होणार असून, वैयक्तिक माहिती संबंधित नागरिकाच्या संमतीशिवाय उपयोगात आणली जाऊ शकणार नाही. या कायद्यामुळे वैयक्तिक स्तरावरील प्रत्येक नागरिकाच्या डिजीटल माहितीचे संरक्षण होऊन व्यावसायिक कारणांसाठी या माहितीचा होणारा उपयोग थांबेल, असा विश्वास माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महसंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केला.

मंत्रालयातील परिषद सभागृहात भारतीय लोक प्रशासन संस्थेच्या वतीने आयोजित प्रशिक्षण वर्गात ' डिजीटल पर्सनल डाटा प्रोटेक्शन कायदा, २०२३ आणि शासकीय अधिकाऱ्यांची भूमिका व जबाबदाऱ्या ' या विषयावर प्रधान सचिव ब्रिजेश सिंह मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर लोक प्रशासन संस्थेचे अध्यक्ष स्वाधीन क्षत्रिय, संस्थेचे मानद खजिनदार विनायक देवधर उपस्थित होते.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले, जगात सध्या सायबर क्राईमच्या माध्यमातून तयार झालेली अर्थव्यवस्था मोठी आहे. भारताच्या सकल देशातंर्गत उत्पादन (जीडीपी) पेक्षा दुपटीचा या अर्थव्यवस्थेचा आकार आहे. यावरून आपण सायबर क्राईममधून होणाऱ्या व्यवहारांची व्याप्ती लक्षात घेऊ शकतो. नवीन डीपीडीपी कायद्यामुळे नागरिकांची माहिती संरक्षित होणार असल्यामुळे व्यावसायिक स्वरूपात माहितीचा उपयोग करता येणे शक्य नाही. शासन लोककल्याणकारी उद्दिष्टासाठी योजनांच्या क्रियान्वयनकरिता माहितीचा उपयोग करू शकते.



डीपीडीपी कायदा मे २०२७ पासून अंमलात येणार आहे. यापूर्वी कायद्यातील तरतुदींप्रमाणे विभागांना विविध अंमलबजावणी यंत्रणा निर्माण करण्यासाठी वेळ दिलेला आहे. कायद्याच्या अंमलबजावणीनंतर एखाद्या योजनेसाठी उपयोगात येणाऱ्या नागरिकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करण्याची जबाबदारी यंत्रणांची असणार आहे. कुणाचीही वैयक्तिक माहिती विविध समाज माध्यमे, ईमेल आदींद्वारे पाठविता येणार नाही. 'डाटा ब्रिच' झाल्यास संबंधितांना दंड भरावा लागणार आहे. वैयक्तिक माहिती देता येणार नाही, मात्र समुच्चक माहिती आकडेवारी स्वरूपात देता येणार आहे, अशी माहितीही प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी दिली.

प्रधान सचिव ब्रिजेश सिंह म्हणाले, या कायद्यानुसार वैयक्तिक माहिती घेण्यासाठी संबंधित नागरिकाला पूर्वसूचना द्यावी लागेल. त्याची संमती घेऊनच माहितीचा उपयोग करता येणार आहे. तसेच माहिती ज्या उद्देशासाठी घेण्यात आली आहे, त्याच उद्देशाकरिता माहिती उपयोगात आणता येणार आहे. त्यासाठी माहिती प्राप्त करण्याच्या उद्देश, नागरिकांकडून निवड व संमती, माहितीच्या संकलनावर मर्यादा महत्वाच्या असणार आहे.

प्रशिक्षणादरम्यान उपस्थितांना प्रश्न विचारण्याची संधी देऊन त्यांच्या प्रश्नाचे समाधान करण्याचा प्रयत्न प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी केला. तसेच प्रशिक्षण सत्राच्या शेवटी कायद्यावर आधारित प्रश्नावली सादर करून त्यावर उत्तरे घेण्यात आली. प्रशिक्षण सत्र संवाद स्वरूपात घेण्यात आले. अध्यक्ष स्वाधीन क्षत्रिय यांनी प्रशिक्षण वर्गाबाबत समाधान व्यक्त करीत आभार मानले. प्रशिक्षण वर्गाला अधिकारी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.